प्रेस नोट ता.२०/०५/२०२३

**चिखली पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी सराईत चोरास ठोकल्या बेडया दोन मोटर सायकल चोरीचे व दोन लॅपटॉप चोरीचे असे एकुन ४ गुन्हे उघड**

मागील तीन ते चार महिन्यांपासुन चिखली पोलीस ठाणे व पिंपरी-चिंचवड परिसरामधुन मोठया प्रमाणात वाहन चोरीला जात आहेत. त्यामुळे अश्या मोटार सायकल चोरीला प्रतिबंध व्हावा यासाठी उपाय म्हणुन मा. वरिष्ठांच्या निर्देशनानुसार चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेश्वर काटकर, यांनी वाहन चोरी विरोधी पथक तयार करुन त्याअनुषंगाने पोलीस ठाणेच्या हददीमध्ये नियमीत पेट्रोलींग करण्यास व बातमीदार नेमुन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

त्यानुसार आज दि.२०/०५/२०२३ रोजी वाहन चोरी विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी श्री.राकेश गुमाने, सहा.पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अमलदार पोहवा.११३३/साकोरे, पोना.१५४६/ गायकवाड, पोना.१८५६/पिंजारी, असे मोटर सायकल चोरीस प्रतिबंध होण्याच्या अनुषंगाने चिखली पोलीस ठाणेच्या हददीमध्ये पेट्रोलींग फिरत असतांना असतांना त्यांना नेवाळेवस्ती व हरगुडेवस्ती दरम्यान एक संशयीत इसम मोटार सायकलवरुन येत असल्याचे दिसुन आले.त्यास त्यांनी थांबवुन त्याचेकडील मोटार सायकल बाबत खात्री करता त्याचेकडे मोटार चालविण्याचा परवाना व मोटार सायकल मालकी संदर्भात कोणतेही कागदपत्र उपलब्ध नव्हती,तसेच त्याचेकडे वाहनाबाबत खात्री करता उडवाउडवीची उत्तरे दिली. सदरचा इसमाची हालचाल संशयास्पद दिसुन आल्याने त्यांनी त्याचेकडे असलेली सॅक पाहता त्यामध्ये दोन लॅपटॉप दिसुन आलेले आहेत.लॅपटॉप बाबत देखील त्याचे कडे माहीती विचारता तो कोणतेही समाधानकारक उत्तरे दिली नाही,त्यामुळे सदर इसमाला नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव-टिकम बिवाराम चंद,वय-२५ वर्ष रा.सोळंकी डिस्ट्रीब्युटस्,सी/३९/४०,कुणाल प्लाझा,चिंचवड रेल्वे स्टेशन रोड, चिंचवड,पुणे मुळ रा.मु.पो.शेहवाज ता.मारवाड जंक्शन जि.पाली राज्य राजस्थान असे असल्याचे सांगितलेले आहे. त्यास त्याचे ताब्यातील मोटर सायकल व लॅपटॉपसह चिखली पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नंबर एम.एच.१४ ईई १४१६ व लॅपटॉपबाबत श्री.राकेश गुमाने यांनी विश्वासामध्ये घेवून चौकशी केली असता त्याने काल दिनांक १९.०५.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजण्याचे सुमारास नेवाळेवस्ती येथुन मोटार सायकल चोरलेली असल्याचे सांगितलेले आहे.तसेच लॅपटॉपबाबत चौकशी करता त्याने पुर्णानगर व जाधववाडी येथे कारची काच फोडुन त्यामधील लॅपटॉप व मोटार सायकलचे हॅन्डलला लावलेला लॅपटॉप चोरी केलेला असल्याचे सांगितलेले आहे.सदर चोरीबाबत चिखली पोलीस ठाणेकडील अभिलेखाची पाहणी करता मोटार सायकल चोरीबाबत चिखली पोलीस ठाणे गु.र.नं.३३६/२०२३ भादविक ३७९ व लॅपटॉप चोरीबाबत चिखली पोलीस ठाणे गु.र.नं.३३८/२०२३ भादविक ३७९,४२७ व गु.र.नं.३३९/२०२३ भादविक ३७९ प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आलेले आहे.आरोपी याचे ताब्यातुन १)२०,००० रुपये किंमतीची एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नंबर एम.एच.१४ ईई १४१६, २)३०,००० रुपये किंमतीचा एक एच.पी.प्रो बुक-४४० जी-४ कंपनीचा सिल्वर रंगाचा लॅपटॉप, ३) ४०,००० रुपये किंमतीचा एक डेल कंपनीचा काळया रंगाचा लॅपटॉप, ४) ५०० रुपये किंमतीची एक काळया रंगाची लॅपटॉप बॅग असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

त्यानंतर सदर आरोपीस चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३३६/२०२३ भादवि कलम ३७९ मध्ये अटक करुन त्याचेकडे पोलीस कस्टडीत असतांना तपास केला असता त्याने गेले ४ दिवसापुर्वी रामनगर,चिंचवड,पुणे येथुन एक हिरो स्प्लेंडर मो.सा.नंबर एम.एच.२२.के.४२७४ ही चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने ती मोटर सायकल जप्त केली आहे.सदर बाबत पिंपरी पोलीस ठाणेत गुन्हा दाखल असल्याची नोंद आहे.

सदरची कारवाई आम्ही तसेच देहुरोड विभागाचे सहा. पोलीस आयुक्त श्री. पदमाकर घनवट, चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,श्री. राकेश गुमाने, पोहवा/११३३ साकोरे, पोहवा/५७२ पांढरे,पोहवा/९६४ नागरे,पोना/९६२ राठोड,पोना.१५४६/गायकवाड, पोना/१८१३ सुतार,पोना.१८५६/पिंजारी, या पथकाने केली आहे. असुन त्यांनी एकुन ४ गुन्हे उघडकीस आणले आहे.

**( श्री. काकासाहेब डोळे, )**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,पिंपरी चिंचवड**

Scanned with CamScanner